# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


**जा.क्र.मनपा/आस्था/ 2278 /2024-25** **दि.14 / 10 /2024**

<u>**परिपत्रक**</u>

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागात सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे सेवाविषयक बाबींबाबत महत्वाची कामे होत असतात. अशावेळी इतर विभागातील काही कर्मचारी त्यांच्या विभागातील कामे सोडून आस्थापना विभागात त्यांच्या सेवाविषयक कामानिमित्त येत असल्याचे व कामकाजाबाबत विचारणा केल्यानंतरही आस्थापना विभागात किंवा विभागाच्या आवारात फिरत असल्याबाबत निदर्शनास आलेले आहे.

तरी यापुढे महानगरपालिकेच्या सर्व कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगी शिवाय आस्थापना विभागात येऊ नये, तसेच आस्थापना विभागाशी संबंधीत काहीही कामकाज असल्यास दुपारी 3.00 ते 5.00 यावेळेत सहा.आयुक्त, आस्थापना विभाग यांचेशी संपर्क साधावा. सदर आदेशाचे तंतोतंत पालन करावे. अन्यथा महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपिल) नियम 1979 अंतर्गत तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व कर्मचारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव-
1. मा.आयुक्त
2. मा.अतिरिक्त आयुक्त (1) व (2)
3. उप-आयुक्त (सर्व)
4. विभागप्रमुख (सर्व)
   मिरा भाईंदर महानगरपालिका